“डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान सभेतील भाषणे – एक ऐतिहासीक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड
मानव्यविद्या शाखेअंतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी)
पदवीसाठीचा संशोधन आराखडा

संशोधक

कपिल वसंतराव कांबळे

मार्गदर्शक

डॉ. नितीन बावळे

सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख

शारदा महाविद्यालय, परभणी.

इतिहास अभ्यास मंडळ सदस्य स्वा.रा.ति.म.नांदेड.

संशोधन केंद्र

ज्ञानोपास महाविद्यालय, परभणी.

2022

प्रस्तावना

15 ऑगस्ट 1947 ला भारताला स्वातंत्र मिळाले. भारतीय जुलमी ब्रिटीशाच्या तावडीतुन मुक्त झाले परंतु भारताच्या समोर अनेक समस्या तोंड वर काढुन उभे होत्या. त्यामध्ये भारतात असलेली राजकीय, सामाजीक आणि आर्थिक विषमता तसेच भारताच्या फाळणी ने निर्माण झालेली निर्वासीतांची समस्या, संस्थानीकांच्या समस्या आणि भाषीक व प्रादेशीक समस्या तसेच विविध जाती, वर्ण व्यवस्था विविध धर्म व शोषीत समाज यांना एकत्र करुन अखंड भारताची निर्मीती करणे.

पहिल्या व दुस-या महायुध्दानी जगात उदभवलेल्या परिस्थीतीने भारताचे स्वातंत्र हे निश्चती केलेले होते परंतु भारतात राज्यकारभारासाठी कोणती घटनात्मक प्रणाली स्वीकारली जाणार ? या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी 1919 ते 1947 अशी 28 वर्षे लागली. त्यातही कैबिनट मिशन 1946 मधील तरतुदी नुसार जुलै 1946 संविधान सभेसाठी मतदान झाले. 9 डिसेंबर 1946 रोजी दिल्ली येथे संविधान सभेची प्रथम बैठक झाली त्यामध्ये सच्चिदानंद सिन्हा हे भारतीय संविधान सभेचे तात्पुरते अध्येक्ष म्हणुन निवड करण्यात आली. 11 डिसेंबर 1946 ला संविधान सभेची दुसरी बैठक झाली त्यामध्ये डॉ.राजेंद्र प्रसाद आणि एच.सी मुखर्जी यांची संविधान सभेचे अध्यक्ष व उपाध्येक्ष म्हणुन निवड करण्यात आली तसचे बि.एन.राव यांची नेमनुक संविधान सभेचे कायदेशीर घटनात्मक सल्लागार म्हणुन नेमनुक करण्यात आली.16 ऑगस्ट 1947 रोजी डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीची स्थापना करण्यात आली. भारतीय संविधान निर्मीतीला 2 वर्षे 11 महिने 17 दिवसाचा कालावधी लागला. बाबासाहेबांनी घटनेची निर्मीतीच केली नाही, तर 2473 सूचना व उपसूचनांवरील चर्चेला सपर्मक उत्तरे देऊन या घटनेतील तरतुदी आणि तत्त्वांचे तार्किक समर्थनही केले. त्यामध्ये भारतिय संविधान सभेची एकुण 11 सत्र आयोजीत करण्यात आले होते.त्यांचा एकुण कालावधी 165 दिवस होता भारतीय संविधान सभेचे शेवटचे सत्र 16 नोव्हेंबर 1949 रोजी झाले त्याच दिवशी भारतीय संविधानाचा स्विकार करण्यात आला.

भारतीय राज्यघटना ही स्वतंत्र भारताचे एक बलस्थान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवितकार्याला जे अनेक पैलू आहेत; त्यातील राज्यघटनेच्या निर्मितीतील त्यांचे योगदान हा एक महत्त्वाचा अध्याय असून सध्याच्या काळात त्याचे अभ्यास करणे अत्यंत प्रस्तुत ठरते त्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधाने सभेतील भाषणे आणि संविधान सभेतील चर्चा यांचा अभ्यास करुन वर्तमान भारतातील समस्या समजून घेणे उपयुक्त ठरत

1.समस्या सूत्रन

भारताच्या घटनात्मक विकासात प्रत्येक टप्प्यावर ज्यानी आस्था पूर्वक दूरदृष्टीले परिश्रम घेतले त्यामध्ये अग्रस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर असून नंतर तेज बहादुर सपू. बॅ. जयकर, चिमनलाल सेटलवाड, डॉ. साचिदानंद यांचा क्रम लागतो. या सर्वांच्या घटनात्मक कार्याचा अभ्यास करुन त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची आणि भूमिकेची चिकित्सक माडणी करण्यासाठी त्यांनी संविधान सभेत संविधानातील कलमांवर अभ्यासपूर्ण भाष्य केले. संविधान सभेतील सदस्यानी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांची समाधानकारक आणि विचारप्रवृत्त करणरी उत्तरे त्यांनी दिली. त्यानी भारतातील संविधानातील विविध कलमांच्या संदर्भात केलेले भाष्य हे आज देशील उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांकरिता मार्गदर्शक आहे. भारतीय संविधान हे स्वंतत्र भारताचे एक बलस्थान आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या जिवितकार्याला ते अनेक पैलू आहेत त्यातील संविधान निर्मीतीत बाबासाहेबांचे योगदान हा एक महत्वाचा भाग असुन त्याच्या संविधान सभेतील भाषणातुन आपल्या त्यांच्या दुरदर्शी पणची कल्पना येते त्यामुळे “ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान सभेतील भाषणे – एक ऐतिहासीक अभ्यास “ असे संशोधनाच्या विषयाचे समस्यासूत्रण मांडले आहे. सदर विषयावरील संशोधन हे मुलभूत प्रकारचे व पुर्नविश्लेषणाचे असून त्यामुळे काही नवी माहिती प्रकाशात येईल. नवीन अन्वयार्थ मांडता येईल.

2. संशोधनाची उददीष्टे :-

प्रस्तावीत संशोधनातुन पुढील उददीष्ट साध्य करण्यात येतील.

1. संविधान सभेच्या निर्मीतीच्या इतिहासाचा मागोवा घेणे.
2. भारत एक अखंड राष्ट्र रहावे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका समजुन घेणे.
3. संविधान सभेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मानवतावदी दृष्टीकोण समजुन घेणे.
4. संविधान सभेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची नागरीकत्वा बाबतची भूमीका जाणून घेणे.
5. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्वातंत्र, समता आणि बंधुत्वाच्या भूमिकेची चिकित्सा करणे.
6. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे घटनात्मक उपाय योजनाचा हक्क याबाबत विचाराचा चिकित्सक अभ्यास करणे.

7. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्म निरपेक्षतेबाबत असलेल्या भूमिकेचा अभ्यास करेणे.
8. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संघराज्य व राज्य विषयक संकल्पनाचा अभ्यास करणे.
9. संविधान सभेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कर्तुत्वाची व भूमिकेची चिकित्सा करणे.
10. भविष्यात संविधानातील विकासाची दिशा काया राहणार याचा अंदाज घेणे.

3. संशोधनाची गृहीतके :-

भारतीय संविधान हे स्वंतत्र भारताचे एक बलस्थान आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या जिवितकार्याला ते अनेक पैलू आहेत त्यातील संविधान निर्मीतीत बाबासाहेबांचे योगदान हा एक महत्वाचा भाग असुन त्याच्या संविधान सभेतील भाषणातुन आपल्या त्यांच्या दुरदर्शी पणची कल्पना येते. यावरुन संशोधनाची गृहीतके पुढील प्रमाणे :-

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वातंत्र भारत हा आखंड भारत हे स्वप्न होते.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशात स्वातंत्र, समता व बंधुत्वता स्थापन करण्याचा भारतीय संविधान माध्यमातुन प्रयत्न केला.
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वधर्म समभाव राखुन भारताला अखंड ठेवण्यासाठी धर्मनिरपेक्ष संविधानाची निर्मीती केली.
4. भारतातील विविध सांस्कृतीचे संवर्धन आणि जतन करण्याचा प्रत्येकाला संविधानीक अधिकार दिला.
5. भारतीय संविधान मध्ये संविधानाचा उगमस्थान ही भारतीय जनता असुन तीचे सामाजीक समता स्थापन करण्याचा प्रयत्न केला.
6. संविधानात दिलेल्या मुलभूत हक्काचे उल्लघंन झाल्यास संविधानीक उपाय योजनाचा अधिकार दिला.
7. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वसमावेशक घटना लिहुन त्यातुन राजकीय समता स्थापीत करण्याचा प्रयत्न केला.
8. भारतीय संविधानात भविष्यात उदभवणा-या समस्ये बाबत आपल्या भाषणातुन गर्भीत इशारे दिले.

9. भारतीय संविधान सभेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकराची महत्वपूर्ण भूमिका व कार्य आहे.

10. भारतीय संविधानाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एकमेव शिल्पकार आहेत.

उपरोक्त गृहितकाच्या अधारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान सभेतील भाषेणे – एक ऐतिहासिक अभ्यास या विषयाचे संशोधन करुन निष्कर्ष नोंदविण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

प्रस्तुत विषयाचा मुख्य हेतू म्हणजे संशोधनाच्या मर्यादा स्पष्ट कराव्या लागतात. संविधान सभेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे – एक ऐतिहासीक अभ्यास या विषयाची व्याप्ती संविधान सभेची स्थापना ते संविधान सभेचे शेवटचे सत्र 1950 पर्यंत ही असली तरीही, विषयाच्या अनुषंगाने काही बदल होऊ शकतात.

4. संशोधन पध्दती व संशोधन कार्यासाठी तथ्ये संकलन :-

प्रस्तुत संशोधन विषयासाठी चिकित्सक संशोधन पध्दतीचा अवलंब करुन प्राथमीक, द्वितीय स्त्रोतामधुन माहिती संकलीत केली जाईल. त्याच प्रमाणे ऑनलाईन साधनाद्वारे त्या विषयाची महत्वपूर्ण माहिती संकलित केली जाईल. तत्कालीन वर्तमानपत्रे व त्याकाळातील घडामोडीवर आधारीत ग्रंथाचा चिकित्सकपणे अभ्यास करुन संशोधन कार्य केले जाईल व त्याचे वस्तुनिष्ठपणे विश्लेषण करुन निष्कर्ष स्थापित केले जातील.

प्राथमीक साधने :-

1. भारतीय संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांनी तत्कालिन घटनांचा अभ्यास करुन लिहिलेले ग्रंथ
2. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संपादित केलेल्या पाक्षिक बहिष्कत भारताचे अंक तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे मुखपत्र असलेल्या जनता पाक्षिकाचे अंक.
3. भारताचे प्रमुख नेते यांनी लिहलेली तत्कालीन पुस्तके.
4. भारतीय संविधानाची रचना – निवडक दस्ताऐवज खंड-एक(संविधानाची मागणी संविधान सभेचे गठण)

5. भारतीय संविधानाची रचना – निवडक दस्ताऐवज खंड-दो(समित्याचे अहवाल)

6. भारतीय संविधानाची रचना – निवडक दस्ताऐवज खंड- तिन(संविधानाचा मसुदा)

7. भारतीय संविधानाची रचना – निवडक दस्ताऐवज खंड- चार(मसुदा संविधानावरील सुचना)

8. भारतीय संविधानाची रचना- एक अभ्यास खंड-पाच

9. संविधानाच्या मसुदयावर संविधान सभेत झालेल्या चर्चाचे संसदेने संपादीत केलेले खंड-1 ते10

दुय्यम अथवा दवितीयक साधने :-

सदर संशोधन कार्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विविध लेखकांनी लिहलेले चरित्र, महात्मागांधी, पंडित जवाहरलाल नेहरु, बॅरिस्टर जीना यांचे चरित्र, भारतीय संविधानावर लिहलेले ग्रंथ, भारताच्या संविधानिक इतिहासावर लिहिलेले ग्रंथ, आधुनिक भारताच्या इतिहासावर लिहिलेले ग्रंथ तसेच ऑनलाइन साहीत्य इत्यादी संदर्भ ग्रथांचा उपयोग प्रस्तुर संशोधनासाठी करण्यात येणार आहे.

5. संशोधन विषयाचा आढावा :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्व भारतीयांना सामाजीक, राजकीय आणि आर्थीक विषमता दुर करण्यासाठी आपल्या ज्ञानाचा आणि विदवत्तेचा वापर करुन अखंड भारतासाठी संविधान निर्मीतीमध्ये संविधान सभेच्या मसुदा समिती मार्फत विविध सदस्याच्या प्रश्नाना आणि स्वतंत्र भारतासमोर असलेल्या विविध समस्या सोडवण्याचा प्रश्नाना आपल्या बुध्दीचार्तुयाचा जोरावर समर्पक उत्तरे देवुन त्याचे समाधान केले आणि अखंड भारताच्या निर्मीतीसाठी स्वातंत्र समता आणि बंधुता स्थापन करुन विषमता दुर करण्याचा जो प्रयत्न केला त्याबाबत या संशोधनामार्फत विशेष प्रकाश टाकला जाईल की, जो आजतागायत दुर्लक्षित राहीलेला भाग आहे.

प्रकरण रुपरेषा

प्रस्तुत शोध प्रबंधची विभागणी पाच प्रकरणात करण्यात आली असून प्रबंधाच्या स्वरुपाच्या आकलनास्तव प्रकरणचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

1. **प्रस्तावना व संशोधन पध्दती :-**

   या प्रकरणात प्रस्तुत सशोधनात विषयाची प्रस्तवना मांडण्यात येईल. विषय निवडीचा हेतु, विषयाची मर्यादा व महत्व, संशोधनाची उददीष्टये, गृहितकृत्ये, तथ्य संकलन व संशोधन पध्दती या संदर्भात स्पष्टीकरण देण्यात येईल.

2. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जिवनचरित्र** :-

   प्रस्तुत प्रकरणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म,बालपन,शिक्षण,कौटुबिक जीवन, त्याची कामगिरी इत्यादी उपघटकांच्या संदर्भात वस्तनिष्ठपणे अभ्यास करुन मांडणी करण्यात येईल.

3. **संविधान सभेची निर्मीती :-**

   प्रस्तुत प्रकरणात भारतातील स्वातंत्रलढा आणि संविधान सभेची निर्मीती इतिहासा संदर्भात माहीती देण्यात येईल.

4. **डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे संविधान सभेतील भाषणे :-**

   प्रस्तुत प्रकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान सभेतील भाषणे त्यानी संविधान सभेतील सदस्यानी उपस्थीत केलेल्या प्रश्नाना दिलेली उत्तरे आणि संविधान निर्मीतीसाठी केलेल्या भाषणाचा

चिकित्सक अभ्यास करण्यात येईत त्यासाठी संविधान सभेची एकुण 11 सत्रे झाली त्याची विभागणी पुढील उपप्रकरणाच्या माध्यमातुन करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संविधान सभेतील भुमिका व कार्य स्पष्ट करण्यात येतील.

1. **संविधान सभेचे प्रथम ते तिसरे सत्र**

   या उप प्रकरणात संविधान सभेची प्रथम ते तिसरे सत्र या कालावधी मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे व चर्चा सत्राची विचार करण्यात येईल

2. **संविधान सभेचे चौथे ते आठवे सत्र**

   या उप प्रकरणात संविधान सभेची चौथे ते आठवे सत्र या कालावधी मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे व चर्चा सत्राची विचार करण्यात येईल

3. **संविधान सभेचे नववे ते अकरावे सत्र**

   या उप प्रकरणात संविधान सभेची नववे ते अकरावे सत्र या कालावधी मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे व चर्चा सत्राची विचार करण्यात येईल.

   प्रस्तुत प्रकरणाचा चिकित्सक अभ्यास करुन निष्कर्ष मांडण्यात येईल.

5. **निष्कर्ष** :-

   सदरिल संशोधनात संकलित केलेल्या तथ्यांच्या आधारे गृहीतकांची पडताळणी करुन निष्कर्ष काढण्यात येईल.

संदर्भग्रंथ

मराठी ग्रंथ

1. कसबे रावसाहेब, डॉ.आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना (तुत्तीय आवृत्ती -2001) सुगावा प्रकाशन 562,सदाशिव पेठ पुणे -30
2. कांबळे बी.सी. समग्र आंबेडकर चरित्र खंड-सातवा (दुत्तीय आवुत्ती 2007) सुगावा प्रकाशन 562,सदाशिव पेठ पुणे -30
3. कांबळे बी.सी. समग्र आंबेडकर चरित्र खंड-आठवा (दुत्तीय आवुत्ती 2007) सुगावा प्रकाशन 562,सदाशिव पेठ पुणे -30
4. कांबळे एन.जी.,पुणे करार: उज्ज्वल भविष्याचा प्रारंभ (प्रथमावृत्ती 2009) कौशल्या प्रकाशन,हडको औरंगाबाद-2
5. कीर धंनजय,यांनी इतिहास घडविला.(दुसरी आवृत्ती-2013) इंडिया प्रिटींग वर्क्स,वडाळा मुंबई-440031

6. कीर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर (नववी आवृत्ती-1994) पॉप्युलर प्रकाशन,प्रा.लि.ताडदेव,मुंबई -440034
7. कीर धनंजय, विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर : मानस आणि तत्वविचार , पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि.ताडदेव,मुंबई 440034
8. कुबेर वा.ना., डॉ आंबेडकर : विचर मंथन, (तिसरी आवृत्ती) सुगावा प्रकाशन 861/1 सदाशिव पेठ,पुणे-30
9. कुबेर वा.ना., भारताचा स्वातंत्र्य लढा-1930-34 (प्रथमावृत्ती-2002) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई-14
10. केळकर भा.कृ. भारतळभूषण डॉ.बाबासाहेब आंबेउकर (प्रथमावृत्ती 1985) सुगावा प्रकाशन,सादाशिव पेठ पुणे-30
11. खैरमोडे चांगदेव भगवान , डॉ.भीमराव रामजी आंबेडकर खंड -4 (द्वितीय आवृत्ती-1989) सुगावा प्रकाशन,सदाशिव पेठ पुणे-30
12. खैरमोडे चांगदेव भगवान , डॉ.भीमराव रामजी आंबेडकर खंड -5 (द्वितीय आवृत्ती-1988) सुगावा प्रकाशन,सदाशिव पेठ पुणे-30
13. खैरमोडे चांगदेव भगवान , डॉ.भीमराव रामजी आंबेडकर खंड - 6 व 7 (प्रथमावृत्ती-1989) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई 32
14. खैरमोडे चांगदेव भगवान , डॉ.भीमराव रामजी आंबेडकर खंड - 8 (प्रथमावृत्ती-1983) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई 32
15. खैरमोडे चांगदेव भगवान , डॉ.भीमराव रामजी आंबेडकर खंड - 9 (प्रथमावृत्ती-1983) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई 32
16. खैरमोडे चांगदेव भगवान , डॉ.भीमराव रामजी आंबेडकर खंड – 10 (प्रथमावृत्ती-1989) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई 32
17. खैरमोडे चांगदेव भगवान , डॉ.भीमराव रामजी आंबेडकर खंड - 11 (द्वितीयआवृत्ती-2000) सुगावा प्रकाशन सदाशिव पेठ पुणे-30

18. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती,उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन प्रकाशित,डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड 18 भाग -2(1937-1945)
19. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती,उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन प्रकाशित,डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड 18 भाग -3 (1945-1967) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे राजनितीक विचार
20. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती,उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन प्रकाशित,डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड 18 भाग -2(1937-1945)
21. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती,उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन प्रकाशित,डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड 18 भाग -3 (1945-1967) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे राजनितीक विचार

English Books:

1) B.Shivarao, (Editor), The Framing of India's Constitution,
(Select Documents) vol. one.
Universal Law, Publishing Co, New Delhi, 02
2) B.Shivarao, (Editor), The Framing of India's Constitution,
(Select Documents) vol. Two.
Universal Law, Publishing Co, New Delhi, 02
3) B.Shivarao, (Editor), The Framing of India's Constitution,
(Select Documents) vol. Three.
Universal Law, Publishing Co, New Delhi, 02
4) B.Shivarao (Editor) The Framing of India's Constitution,
(Select Documents) vol. Four.
Universal Law, Publishing Co, New Delhi, 02
5) B.shivarao (Editor) The Framing of India's Constitution,
(Select Documents) vol. Five.
Universal Law, Publishing Co, New Delhi, 02
6) Desai A.R,'Social Background of Indian Nationalism,'
(Fith edition 1994) Popular Prakashan, Bombay
7) Dominique Lapierre &Larry Collins, 'Freedom at midnight
(Reprint March 2011) vikas publing house pvt. Ltd. New

Delhi-14.’

Online :-

1) www.scihub.com
2) www.googlescholar.com
3) www.researcheget.com
4) Shodhganga.inflibnet.ac.in

संशोधक विद्यार्थी

कपिल वसंतराव कांबळे

Email id bondskpl@gmail.com

मो.नं 9284741392/9881001375

संशोधन मार्गदर्शक

डॉ. नितीन बावळे

सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख

शारदा महाविद्यालय, परभणी